UGC Approved Journal


E-ISSN: 2455-1511

# Sanskruti International Multidisciplinary Research Journal


URL:www.simrj.org.in Journal UOI:1.01/simrj

IFSIJ IMPACT FACTOR : 2.125


Volume III Issue III Jan-Feb-Mar 2018











Editor-in-Chief
SANTOSH BONGALE

Scanned with OKEN Scanner

**IMPACT FACTOR : 2.125**

E-ISSN : 2455-1511

**UGC Approved Journal**

# *CERTIFICATE*

This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs./....संतोष बोंगाळे ............

Has contributed a paper as author / co-author to

**Sanskruti International Multidisciplinary Research Journal**

(INDEXED, PEER-REVIEWED AND REFEREED JOURNAL)

Title.......................संत साहित्यातील समता ....................................

And has got published in Volume ...III.... Issue ...III...March 2018.
The Editor-in-Chief and The Editorial Board appreciate the intellectual Contribution of the author /co-author.

Executive Editor

Editor-In-Chief
SIMRJ

Scanned with OKEN Scanner

SANSKRUTI INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

*Journal homepage: http://www.simrj.org.in   Journal UOI: 1.01/simrj*

# संत साहित्यातील 'समता'

श्री. संतोष बोंगाळे

संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

ईमेल : mr_bongale@rediffmail.com

**सारांश:**

*संतानी आपल्या अभंग साहित्यामध्ये समतेचा पुरस्कार केला. संतानी सहज सुलभ नाम भक्तीचे माहात्म्य सांगून जन्माधिष्टीत वर्णव्यवस्थेला बगल देऊन माणूस भक्तीच्या द्वारे आत्मोन्नती साधू शकतो असा आशावाद लोकमानसात जागविण्याचे महत्वाचे कार्य केले. मानवता हाच धर्म श्रेष्ठ असतो हे बिंबवले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामंजस्य, सहिष्णुता अशा संविधानिक मूल्यांचा आज सर्वांना विसर पडत चाललेला आहे. राजकीय समीकरणे दिवसेंदिवस बदलत आहेत. जातीय राजकारण वाढत आहे. धर्मनिरपेक्षता या तत्त्वाची धूळधाण उडालेली दिसून येते. अशा समाज वास्तवात माणसांना जीवन जगताना या सर्वच गोष्टींचा सामना करावयाचा आहे. त्यासाठी वैचारिक सामग्री व नैतिक मूल्यांचे आत्मभान आपल्याला संतसाहित्यातून मिळेल. हे निःसंशय सत्य आहे.*

***कळ शब्द:* समता, संत, समाजप्रबोधन, सामाजिक मूल्ये, आध्यात्मिक समता.**

**प्रास्ताविक:**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मराठी साहित्याचा कालखंड तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत मानलेला आहे. या कालखंडात अनेक संप्रदाय उदयास आले. उदा: समर्थ संप्रदाय, दत्त संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, जैन संप्रदाय, शैव संप्रदाय इत्यादी. वारकरी संप्रदायाला सातशेहून अधिक वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. मध्ययुगीन कालखंड हा साहित्यनिर्मितीचा भरभराटीचा कालखंड होता. यात कालखंडात संत ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रात भक्ती चळवळी रुजवण्याची मुहूर्तमेढ रोवली. प्राकृत भाषेत साहित्य निर्मितीस प्रोत्साहन मिळाले. संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांचे समाज उद्धाराचे कार्य आणि योगदान आजच्या पिढीला दिशादर्शक आणि मार्गदर्शक असेच आहे.

## समता म्हणजे काय?

समतेसाठीचा संघर्ष हा असमानतेच्या विरुद्ध असतो. हजारो वर्षांपासून जगात असमानता हे सामाजिक व्यवस्थेचे एक वैशिष्ट्य राहिलेले आहे. जन्मतःच सर्व माणसे सारखी असल्याने जगण्याचा, आपल्या जीवनाला पाहिजे तसा आकार देण्याचा, सर्व सुखसोयी उपभोगण्याचा सर्व व्यक्तींना सारखा अधिकार असणे हे समानतेच्या संकल्पनेचे मुख्य सूत्र आहे. मात्र समाजात धर्म, जात, वंश, आर्थिक परिस्थिती अशा अनेक घटकांमध्ये विषमता असलेली दिसते. समता म्हणजे सारखेपणाची वागणूक असणे. समतेमध्ये मानवनिर्मित विषमता नष्ट करणे शक्य असते. वर्णभेद, जातिभेद, सामाजिक, आर्थिक, राजकीय विषमता नष्ट करून त्याजागी समतेची वागणूक देणे महत्त्वाचे असते. मा. राफेल यांच्यामते, ''प्रत्येक व्यक्तीला आपल्या मूलभूत गरजांचे समान समाधान करण्याचा अधिकार आणि आपल्या क्षमतांना विकास आणि वापर करण्याच्या समान संधी म्हणजे समता होय.'' म्हणजेच सर्व मानव समूहात समानतेची वागणूक महत्वाची आहे.

## तत्कालीन परिस्थिती:

तेराव्या शतकापासून इस्लाम धर्मीयांचे संपूर्ण महाराष्ट्रभर सत्ता पसरत होती. संपूर्ण महाराष्ट्र इस्लाम धर्माने व्यापला होता. अखिल समाजजीवनात शूद्रातिसुद्रांना भक्तीच्या क्षेत्रात कसलेच स्थान नव्हते. विषमतेची वागणूक दिली जात होती. संतानी सर्वांना समजेल असे धर्माचे स्वरूप समाजासमोर मांडले. या संप्रदायाचे मराठी साहित्य निर्मितीस फार मोठे योगदान आहे. संत साहित्याचा हेतू समाज प्रबोधन समाजोद्धार हाच आहे हे दिसून येते. महाराष्ट्रात तत्कालीन कालखंडाचा विचार करता नाथ, महानुभाव व वारकरी असे नानाविध संप्रदाय उदयास येऊन आपापल्या परीने जनमानसात प्रभाव पाडत होते. संप्रदायाच्या तत्वज्ञानाचे महत्व रुजवत होते. संत नामदेवांनी 'येथ जाती अप्रमाण मानून अठरापगड जातीतील सर्वसाधारण लोकांना एकत्र करून भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत नेली. अन्याय, अत्याचार, वेदनांना अभंगाद्वारे मांडून आपल्या भावनांना वाट करून दिली. संतांच्या ठिकाणी जातीच्या चौकटी उच्चनीचतेच्या भिंती स्त्री–पुरुष भेदभाव नव्हता. त्यांनी समानतेचे सूत्र अवलंबले. आध्यात्मिक क्षेत्रातील एकात्मता, बंधुत्व, स्वातंत्र्य पटवून प्रबोधनाचे कार्य केले. 'देव एकच आहे' ही कल्पना संतानी प्रभावीपणे मांडली. एकेश्वर मार्गाचा अवलंब केला. शं. दा. पेंडसे म्हणतात की, 'भागवत संप्रदाय हा आरंभापासूनच विश्ववादी आहे आणि विश्वातील सर्व लोकांना या अविनाशी शांतीचा मार्ग दाखवण्याकरिता आध्यात्मिक सुख व ते प्राप्त करून देणारी अहिंसा सत्यादि नैतिक तत्वे यांचे प्रतिपादन लोकांना केले आहे'.

**समतेची प्रेरणा:**

नवनिर्माणशील साहित्याचा त्या त्या काळातील समाज, परंपरा, धर्म, कला आणि संस्कृतीशी निकटचा संबंध असतो. संत साहित्यातील अभंग निर्मिती ही समाजजीवनातील परिवर्तनाच्या प्रेरणेने झालेली आहे, हे सत्य नाकारून चालणार नाही. वारकरी संप्रदायातील संतांनी पुराणग्रंथातून समतेची प्रेरणा घेऊन आध्यात्मिक क्षेत्रात ती रुजविण्याचे व फुलविण्याचे महान कार्य केले.

**'स्त्रियों वैश्यस्तथा शुद्रो तोही याति परांगतिम' (भगवतगीता)**

भगवद्‌गीतेमध्ये ज्या काळात स्त्री शुद्रांना आध्यात्मिक समता नाकारली होती त्या काळात आत्मउन्नतीची साधने केवळ त्रैवर्णीकांत होती. त्यामुळे माणूस म्हणून सर्वजण समान आहेत वर्णजाती, उच्चनिच मानणे गैर आहे हे संतांनी ठणकावून सांगितले. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी संस्कृत ऐवजी मराठी भाषेत सांगून त्यांनी कर्म सिद्धांताचा पुरस्कार केला. संतसाहित्याने ब्राह्मणी वर्चस्वाला हादरा देऊन समतेची मूल्ये रुजविण्यात धन्यता मानलेली आहे.

**संत साहित्यातील समता:**

''ज्याचे अंतरी निर्धार। वदे कोमल जिव्हार।। नाही द्वेष जया चित्ता। सर्वभूती त्या समता।।'' अशी संत तुकारामांनी समतेची व्याख्यान केली आहे. ''हरीहरा भेद नाही। करू नये वाद।।'' असे नामदेवांनी सांगितले आहे.

संतभार पंढरीत। कीर्तनाचा गजर होत।।

तेथें असे देव उभा। जैसी समचरणांची शोभा।।

पंढरीत समतेची शिकवण देणारा पांडुरंग भक्तासाठी उभा आहे असे संत जनाबाई म्हणतात.

**समचरण दृष्टी विटेवरी साजिरी। तेथे माझे वृत्ती राहो।।**

संत तुकाराम महाराज ही आपल्या अभंगात आपली वृत्ती विठ्ठलाच्या समतेसारखी असावी अशीच अपेक्षा करतात. एका ठिकाणी कबीर असे म्हणतात की,

**ढोल, ग्यांवार शुद्र पशु नारी। ये सब ताडन के अधिकारी ।।**

तसेच बसवेश्वरांनी आध्यात्माची सांगड चळवळीच्या तत्त्वज्ञानाबरोबरच आणि काव्याबरोबर घालून अवैदिक तत्वज्ञानातील समता या तत्वाला पुरस्कार केला आणि समन्वयात्मक भूमिका स्वीकारून उच्चवर्णीयांच्यात असलेली ईश्वर पूजनातील मिरासदारी मोडून काढली. तसेच चळवळीत वर्ण जाती उच्चनीचता स्त्री–पुरुष असा भेद न मानता सर्वांसाठी भक्तीचे दार खुले केले. वचन साहित्याची निर्मिती केली.

उचनीच नाही नामाचिया पुढे। जातीचे ते गाढे नाही काम।।

अनामिकाहूनी असोत चांडाळ। परी नामाचा उच्चार मुखी वसो।।

नाथांनी त्यांना परमार्थाच्या मार्गाला लावण्याचे बहुमोल कार्य केले. पुढे ज्ञानदेवांना हे समतेचे कार्य माहित होते. त्यांनी जनसामान्यांना आत्मोद्धाराचा मार्ग दाखवून आध्यात्मिक समतेचे विचार लोकभाषेत मांडून चिद्विलासवादाची मांडणी केली.

संतांनी स्त्री–पुरुष समतेचा पुरस्कार केला. संतानी सहज सुलभ नाम भक्तीचे माहात्म्य सांगून जन्माधिष्टीत वर्णव्यवस्थेला बगल देऊन माणूस भक्तीच्या द्वारे आत्मोन्नती साधू शकतो असा आशावाद लोकमानसात जागविण्याचे महत्वाचे कार्य केले. मानवता हाच धर्म श्रेष्ठ असतो हे बिंबवले. यज्ञसंस्कृती व संन्यास मार्गाला कडाडून विरोध केला. वैदिक संस्कृतीने सातत्याने समतेला आणि आध्यात्म विचाराला विरोध केल्याचे दिसून येते. ते कर्मकांड व सोवळे–ओवळे या दुष्टचक्रात अडकले होते, हे संतांनी जवळून पाहिलेले होते. संतानी या परंपरेला विरोध करून समतेचा पुरस्कार जनसामान्यांच्या कल्याणासाठीच केला. मानवतेचा आणि समतेचा जयघोष करून लोकमानसात आध्यात्मिक समता प्रस्थापित केली. म्हणून संतांची मानसिकता स्वयंकेंद्रित नसून ती विश्वव्यापक आहे. त्यांची लोकाभिमुकता ही अत्यंत महत्त्वाची ठरते. अठरापगड जातीतील बहुजन संतांनी संपूर्ण महाराष्ट्रात आध्यात्मिक समतेचा विचार मांडला. ओवी व अभंग या रचना प्रकाराचा स्वीकार करून काव्यनिर्मिती केली. हे कार्य समाजाला दिशादर्शक आहे. मध्ययुगीन समाजजीवनात आपण समूहापेक्षा वेगळे आहोत अशी संताना जाणीव झाली नाही कारण मुळात मराठी संत साहित्याचा पाया समत्व हाच आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात संत साहित्याचे योगदान फार मोठे आहे. संत ज्ञानेश्वरांनी गीतेतील तत्त्वज्ञानाच्या साह्याने सहिष्णूवृत्ती, संयमीवृत्ती व समतेची धारणा लोकांना शिकविली. संत चळवळ ही नेहमीच सर्व समावेशक राहिली. शुद्रांची चळवळ असूनही तिने आपल्या कवेत येणारे ब्राह्मण मुसलमान आणि अस्पृश्य या सर्वांचा आदर केला. असे भालचंद्र नेमाडे म्हणतात ते खरेच आहे.

समाजाने वाळीत टाकले असतानाही **'हे विश्वची माझे घर'** असे म्हणणारे संत ज्ञानेश्वर यांनी पहिला समतेचा पुरस्कार केला. आजच्या जागतिकीकरणाच्या व्यामिश्र आणि धकाधकीच्या काळातही वारकरी संप्रदायाने दिलेल्या नैतिक मूल्यांची शिकवण समाजप्रबोधनाचे कार्य करत आहे. सर्वच संतांनी समतेचा पुरस्कार करून हिंदू मुस्लिम असा भेद पंढरीच्या विठ्ठलाच्या दारात नाही हे पटवून दिले. शेख महंमद, शेख सुलतान हे

विठ्ठलभक्त होते. विविध जातीतील संतांनी अभंग रचना करून विठ्ठल भक्तीचा महिमा गातानाच उच्चनीच भेदाला दूर सारून समतेचा स्वीकार केला. संत तुकारामांनी **'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ'** असा समतेचा पुरस्कार करून लोकशिक्षकाची भूमिका बजावली. मराठी भाषेचा गौरव करून स्त्री अस्पृश्यांना समानतेची शिकवण दिली. ज्ञानेश्वरीमध्ये

**मग वाड धाकुटें न म्हणती । सजीव–निर्जीव नेणती ।**

**देखियिले वस्तू उजू लुहिती । मीची म्हणोनी।।**

विवेकी लोक जगाची दुःखे नाहीशी करून जगामध्ये आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतात. लहान–मोठा, उच्चनीच हा भेद तेथे कधीच नसतो. प्रत्येकात ईश्वराचा अंश असतो. सर्वांना समानतेच्या दृष्टीने पाहिले जाते.

**पावले पावले तुझे आम्हा सर्व। दुजा नको भाव होऊ देऊ।।**

संत तुकारामांचा हा भाव, तळमळ समाजाने आचरणात आणली तर भेदाभेद विरहीत समाज अस्तित्वाला येईल हेही तितकेच खरे आहे. एकनाथ महाराजही एका अभंगामध्ये म्हणतात की,

**दृश्य सारुनिया शोभा। समचरणी विठ्ठल उभा।।**

ज्या काळात स्त्री–स्वातंत्र्य, स्त्रियांचे हक्क अशा कल्पनाही सुचणे अशक्य होते, तेव्हा स्त्री–पुरुष समानता हे संतांनी दिलेले मूल्य किती दूरदृष्टीचे होते हे आपल्या सहज लक्षात येईल. जनाबाई तर विठ्ठला **''अरे अरे विठ्या मूळ मायेच्या कारट्या''** असे म्हणते अर्थात जनाबाई समानतेची पताका खांद्यावर घेऊन विठ्ठलाशी सख्य जोडते.

प्राचीन काळी माणसांच्या गुणकर्मावरून त्यांचा वर्णधर्म निश्चित होत असे. पुढे त्याचे जातीमध्ये रुपांतर झाल्याने उच्चनीचता उदयास आली. तुकारामांनी या जातीव्यवस्थेवर कडाडून प्रहार केला. **'अवघी कार्याचीच वीण'** म्हणून त्यांनी **'अठरापगड जाती सकळ वैष्णव । दुजा नाही भाव पंढरीशी।।'** असा सामाजिक व्यवस्थेला समतेचा मार्ग दाखविला. या बाबतीत प्रा. गं. बा. सरदार म्हणतात की, ''ज्या ज्या वेळेस विषमतेबद्दलची चीड अनावर झाली त्या त्या वेळी त्यांनी रूढ कल्पनांचे वाभाडे काढण्यास कमी केले नाही. सर्वमान्य संकेत व स्वतंत्र प्रेरणा यांच्या ह्या झगड्यात तुकारामाच्या जीवनाचे सारसर्वस्व आहे.'' सर्व जातीधर्मात एकत्वाची भावना निर्माण करण्याचे कार्य तुकारामांनी केले. **'भुके नाही अन्नद्य मेल्यावरी पिंडदान।'** अशा शब्दात त्यांनी ढोंगी



Scanned with OKEN Scanner

लोकांच्या विसंगतीवर प्रहार केला. जातिव्यवस्थेच्या विरुद्ध बंड पुकारले. जे समानतेची, माणुसकीची वागणूक देण्यास नकार देतात त्यांना

**महाराशी शिवे। कोपे ब्राह्मण तो नव्हे ।**

**तया प्रायश्चित काही। देह त्याग करिता नाही॥**

अशा परखड शब्दांमध्ये फटकारले. डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात की, "समाजामध्ये समतेचे एक प्रसन्न वातावरण पसरावे ही त्यांची भावना आहे. एक उदात्त तत्त्वज्ञानाचा सुगंध सगळीकडे दरवळावा ही त्यांची धडपड आहे. आपल्या समाजाच्या धर्माला एका अत्यंत घातक आणि कुस्मटलेल्या दुष्प्रवृत्तीतून मुक्त करण्याचे काम त्यांनी केले आहे." समाजातील आचार विचारांच्या तफावतीमुळे समाजाचे अधःपतन होते हे रोखण्यासाठी संतांनी सर्वत्र समतेचा पुरस्कार करून जातीभेद वर्णव्यवस्थेवर प्रहार केले आहेत. सामाजिक समतेसाठी अट्टहास केलेला आहे.

**कोणाही जीवाचा न घडो मत्सर । हे वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥**

असे तुकाराम म्हणतात. बाह्य विषमतेपेक्षा माणसाच्या मनातील भेद–भाव हे समाजाला अधिक घातक आहेत. हे भेद मिटवून

**जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥**

**तोचि साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा ॥**

या तत्त्वानुसार मानवतावादाचा अंगीकार आपणास करावा लागेल.

**समारोप:**

एकंदरीत स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामंजस्य, सहिष्णुता अशा संविधानिक मूल्यांचा आज सर्वांना विसर पडत चाललेला आहे. राजकीय समीकरणे दिवसेंदिवस बदलत आहेत. जातीय राजकारण वाढत आहे. धर्मनिरपेक्षता या तत्त्वाची धूळधाण उडालेली दिसून येते. अशा समाज वास्तवात माणसे जगताना या सर्वच गोष्टींना सामना करावयाचा आहे. त्यासाठी वैचारिक सामग्री व नैतिक मूल्यांचे आत्मभान आपल्याला संतसाहित्यातच मिळेल. हे निःसंशय सत्य आहे. सर्वच संतांनी सहिष्णुता, मानवता, समानता, उदारता समाजासमोर वारंवार ठेवली. जातिभेद निर्मुलनासाठी मूल्यांची पेरणी करून मुक्तीसाठी विचारांचे खतपाणी घातले. समतेचा संदेश देणारी ही चळवळ अत्यंत उपयोगी आहे. संतसाहित्याची सामाजिक फलश्रुती काय असेल तर ती समता आहे हेच स्पष्ट होते.

निष्कर्ष:

१. सामाजिक व नैतिकदृष्ट्या संतांनी समाजोद्धाराने महान कार्य करून समतेची शिकवण दिली.

२. संतांनी समतेचा संदेश देणारी चळवळ उभी करून जातीभेद निर्मुलनासाठी मूल्यांची पेरणी केली.

३. संतांनी आपल्या अभंग साहित्याद्वारे सहिष्णुता, मानवता, समानता, उदारता समाजासमोर ठेवून आत्मोन्नतीचा आध्यात्मिक मार्ग दाखविला.

४. आजच्या जागतिकीकरणाच्या व्यामिश्र आणि धकाधकीच्या काळातही वारकरी संप्रदायाने दिलेली नैतिक मूल्यांची शिकवण आचरणात आणणे गरजेचे आहे.

संदर्भ:


१. गं. बा. सरदार, 'संत वाड्मयाची सामाजिक फलश्रुती', लोकवाड्मय गृह प्रकाशन मुंबई. पृ. १५५

२. डॉ. आ. ह. साळुंखे, 'विद्रोही तुकाराम', लोकायत प्रकाशन, सातारा. पृ. ९३

३. लोकराज्य, ऑगस्ट, २०१८

४. भालचंद्र नेमाडे, 'तुकाराम', साकेत प्रकाशन. पुणे, २०१६, पृ. ८९

५. मा. के. यादव, पाच संत कवयित्री, पुणे, २०१२

६. तानाजी पाटील, समाजजीवनातील तुकाराम, पद्मगंधा प्रकाशन, पुणे





Scanned with OKEN Scanner